संफौ.खटला क्र. १५२८/२०२२.
सरकार वि. संजय.
नि. क्र.१० खाली .

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** - फाल्गुन खुशाल राखडे,

**वय** - ४६ वर्ष, **व्यवसाय** - आगार व्यवस्थापक, गडचिरोली,

**राहणार.**- आगार व्यवस्थापक निवासस्थान, गडचिरोली, ता. व जिल्हा गडचिरोली.

**सरतपास– श्रीमती.एस.पी.वानखेडे वकील यांच्यामार्फत.**

**१.** मी दि.३०.०७.२०२२ रोजी भंडारा आगरामध्ये आगार व्यवस्थापक पदावरती कार्यरत होतो. त्यावेळी भंडारा आगारामध्ये जयनारायण सुर्यवंशी वाहतुक निरिक्षक या पदावरती कार्यरत होते. मी घटनेच्या दिवशी आरोपीला भेटल्यामुळे त्याला ओळखतो. घटनेच्या वेळी तो गोंदिया आगारामध्ये चालक पदावरती कार्यरत आहे. त्यादिवशी शहापुर उडडणपुलावरती एस.टी. बस आणि ट्रकचा अपघात झालेला होता. मला त्याबाबत फिर्यादीकडुन माहिती मिळाली होती.

**२.** त्यामुळे मी इतर कर्मचा–यांसह घटनास्थळी गेलो होतो. त्यावेळी सदर अपघातामध्ये आमच्या गोंदिया आगाराच्या बस क्र.एम.एच.४०/बी.एल./३९८९ ची समोरची काच आणि काऊल तुटलेले होते. घटनेच्या वेळी आमची बस नागपुरकडे येत होती. ती बस आरोपी चालवित होता. आमच्या बसच्या समोर नागपुरकडे जाणारा एक ट्रक क्र.एम.एच.४०/ए.के./७०३७ टायर फुटल्यामुळे उभा होता. सदर अपघातात आमच्या बसचे २०,०००/– रुपयांचे नुकसान झाले होते. आम्ही घटनास्थळी गेलो तेव्हा बसमध्ये प्रवासी नव्हते.

**३.** मला घटनास्थळी असलेल्या टकचा चालक ओळखता आला नव्हता. आम्ही आरोपीकडे अपघाताबाबत विचारपुस केली असता त्याने समोर जाणा–या ट्रकचा टायर फुटुन तो अनियंत्रीत झाल्यामुळे त्याला ओलांडत असतांना अपघात झाल्याचे सांगितले होते. सदर अपघात हो आरोपीच्या चुकीमुळे घडल्याचे निष्पन्न झाले होते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे –श्री.एस.बी.चव्हाण वकील यांच्यामार्फत.**

**४.** अपघात झालेला रस्ता चार पदरी आहे. अपघाताच्या वेळी मी आगारात होतो. मला घटनास्थळी गेल्यानंतर बसच्या समोर असलेल्या ट्रकचा टायर फुटुन तो अनियंत्रीत झालेला

असल्याचे दिसुन आले होते. मी घटनास्थळी गेलो तेव्हा वाहतुकीसाठी रस्त्यातील गाडया बाजुला उभ्या करुन ठेवल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपीने अपघात कसा झाला याबाबत सांगितले नव्हते. मी घटनेच्या दिवशी अपघातग्रस्त बस कोणाला चालवायला दिली होती याबाबत गोंदिया आगारात चौकशी केली होती. पोलीसांनी मला त्याबाबत काहीही मागितले नसल्यामुळे मी त्याचा पुरावा त्यांना दिला नव्हता.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, केवळ ज्या आगाराची बस असते त्याच आगाराला ती बस कोणाला चालवायला दिली आहे, याबाबत माहिती नसते. पोलीसांनी माझा जबाब माझ्या सांगण्यानुसार लिहुन घेतला होता. मी त्यांना अपघातातील ट्रक नागपुरकडे जात असल्याचे सांगितले होते. आता मला माझा जबाब वाचुन दाखविला, सदर बाब त्यामध्ये नमुद नाही. मला ती नमुद नसल्याचे कारण सांगता येणार नाही.

**६.** मला आता पोलीसांना जबाब देतांना सुर्यवंशी साहेबांनी घटनेची माहिती दिल्यामुळे त्यांच्यासोबत घटनास्थळी गेल्याची बाब त्यांना सांगितली होती का, ते आता आठवत नाही. मी अपघात प्रत्यक्ष पाहिला नसल्यामुळे तो कसा झाला याबाबत सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

दिनांक – २३.०८.२०२३. (आर. पी. थोरे)

भंडारा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, भंडारा.